**न्यायालय आदेश अवमान तक्रार क्र. १०/२०२५**

**आदेश नि. यु–७**

१. प्रस्तुतचा अर्ज तक्रारदारांनी अभिलेखावर कायदेशीर वारसदार म्हणुन किरण अश्रुबा गायकवाड हयांचे नाव समाविष्ट करण्यात यावे म्हणुन दाखल केलेला आहे आणि असे प्रतिपादन केले आहे की, अश्रुबा गायकवाड यांचे निधन झाल्यामुळे प्रकरण पुढे चालविणेकरीता तक्रारदार या नात्याने किरण अश्रुबा गायकवाड या वारसदार असल्यामुळे त्यांचा समावेश या प्रकरणात वारसदार म्हणुन होणे आवश्यक आहे. तक्रारदारांनी नि. यु–९ खाली मृत्यु प्रमाणपत्र, वारसा दाखला तसेच विभागीय आस्थापना आदेश क्र. ४२७/२०२५ ची प्रत दाखल केली आहे.

२. प्रस्तुतच्या अर्जावर प्रतिवादी / आरोपी हयांनी जोरदार हरकत उपस्थित करुन असे नमुद केले आहे की, मुळातच या कायदयाअंतर्गत वारसदार अभिलेखावर घेण्यासंदर्भात कोणतीही कायदेशीर तरतुद नाही त्यामुळे हा अर्ज पुर्णपणे फेटाळण्यास पात्र ठरतो.

३. तक्रारदार व प्रतिवादी/आरोपी हयांचे कथन आणि युक्तीवाद याचे अवलोकन केल्यानंतर आणि अभिलेखावर तक्रारदारांनी नि. यु–९ खाली दाखल केलेल्या कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर हे स्पष्ट होते की, किरण अश्रुबा गायकवाड हयांनी मयत अश्रुबा गायकवाड यांचे पत्नी असल्यासंदर्भात वारसा दाखला दाखल केलेला आहे आणि वारसदार म्हणुन त्यांचा समावेश केल्यास प्रतिवादी / आरोपी यांची कोणतीही अपरिमित हानी होणार नाही, त्याचप्रमाणे प्रतिवादी / आरोपी यांच्या या युक्तीवादामध्ये कोणतेही तथ्य आढळत नाही की, वारसदार अभिलेखावर घेण्याचे कायदेशीर तरतुदच नाही.

त्यामुळे अर्जदारांचा अर्ज मंजुर करण्यात येत असुन कायदेशीर वारसदार म्हणुन किरण अश्रुबा गायकवाड हयांना अभिलेखावर नेमण्याची परवानगी देण्यात येत आहे.

SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR

Digitally signed by SHARDUL SHASHIKANT JAHAGIRDAR
Date: 2026.01.02 12:46:03 +0530

**दिनांक :— ०१/०१/२०२६** **(शार्दुल श. जहागिरदार)**

**न्यायाधीश,**

**ठिकाण :— बुलढाणा.** **कामगार न्यायालय, बुलढाणा.**